क्रमांक : १७०८७ /ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ९ डिसेंबर, २०२०

# :: परिपत्रक ::

**विषय** :- महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२० च्या चतुर्थ अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न फेरविचारांती अतारांकित तसेच वस्तुस्थिती करिता पाठविण्यात आलेले प्रश्न व्यपगत केल्याबाबत

**संदर्भ** :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१५७५०/ब कक्ष, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२०

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, संसदीय कार्य विभागाच्या दिनदर्शिकेनुसार सोमवार दिनांक ७ डिसेंबर, २०२० ते शुक्रवार दिनांक १८ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता मा. मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकास निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भाधिन पत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागाला कळविण्यात आली होती. तथापि विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ३ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार विधानसभेचे आगामी चतुर्थ अधिवेशन आता सोमवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२० व मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२० असे दोन दिवस होणार असल्याने सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे विधानसभा नियम ७२ (२) अन्वये प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत. तसेच या कालावधीकरिता संबंधित विभागांकडे वस्तुस्थितीकरिता पाठविलेले प्रश्न फेरविचारांती व्यपगत करण्यात आले आहेत.

(शिवदर्शन साठ्ये)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति :**

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.